दूरध्वनी क्रमांक- ०२३३/ २६२०३७०
ई मेल - diecpdsangali@maa.ac.in
dietsangli@gmail.com
www.dietsangli.co.in

**महाराष्ट्र शासन**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET), सांगली
गुजराती हायस्कूल २ रा मजला, वखारभाग,
महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.जिशिवप्रसंसां/स्टेनो/नों.अ.वि.त./२०२३/ 787 दिनांक २६/०७/२०२३

प्रति,

प्राचार्य,
अध्यापक विद्यालय (सर्व),
जिल्हा सांगली.

विषय - सन २०२३-२४ मध्ये प्रवेशप्रक्रियेमध्ये मान्यताप्राप्त नोंदणीकृत अध्यापक विद्यालयांची तपासणी करणे बाबत.

संदर्भ — १. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे पत्र क्र. राशैसंप्रपम/सेवापूर्व शिक्षण/प्रवेश कक्ष/२०२३-२४/२७३९, दिनांक १६/०६/२०२३ चे पत्र
२. मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे पत्र क्र.शिउसं/प्राथ-२/डी.एड.तपासणी समिती/कोवि/२३/५९७३, दिनांक १९ जुलै २०२३.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, सन २०२३-२४ मध्ये प्रवेश प्रक्रियेमध्ये मान्यताप्राप्त नोंदणीकृत अध्यापक विद्यालयांची तपासणी करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

प्रतिवर्षी ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया पूर्ण झालेनंतर प्रवेशित विद्यार्थी प्रत्यक्ष अध्यापक विद्यालयात उपस्थित नसणे, आवश्यक शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित नसणे, तसेच इतर भौतिक सुविधा अध्यापक विद्यालयात उपलब्ध नसणे, अशा स्वरुपाच्या तक्रारी परिषदेस प्राप्त होतात. या बाबींसंदर्भात विभागीय/जिल्हास्तरावरुन उचित कार्यवाही करणे अपेक्षित आहे. करिता या संदर्भात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था/शिक्षणाधिकारी माध्यमिक कार्यालय प्रमुख/प्रतिनिधी यांची जिल्हास्तरावर विशेष पथक/समिती गठीत करणेत आलेली आहे. सदर पथक/समितीमार्फत अध्यापक विद्यालयाची पुढील बाबीविषयी तपासणी दिनांक १/०८/२०२३ ते दिनांक १८/०८/२०२३ या कालावधीत करण्यात येणार आहे.

१. अध्यापक विद्यालयात एनसीटीई निकषानुसार अर्हताधारक शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत असणे
२. मान्यस्टाफ प्रोफाईल नुसार शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित असणे.
३. एनसीटीई निकषानुसार भौतिक सुविधा उपलब्ध असणेबाबत.
४. प्रवेशित विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती व शैक्षणिक कामकाजाबाबत तपासणी करणे.
५. अनुदानित अध्यापक विद्यालयातील अतिरिक्त शिक्षक संख्या निश्चित करुन इतर अध्यापक विद्यालयात त्यांचे समायोजनाबाबत कार्यवाही करणे.

..२..

Scanned with OKEN Scanner

तसेच डी.एल.एड अभ्यासक्रमसंदर्भात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार(एनईपी २०२०) प्रचलित डी.एल.एड. अभ्यासक्रमाऐवजी एकात्मिक बहुशाखीय शिक्षक शिक्षण अभ्यासक्रम कार्यान्वित होण्याचे नियोजित आहे. त्यानुसार अधिनस्थ संस्था व्यवस्थापन व प्राचार्य, अध्यापक विद्यालय यांना याबाबत विस्तृत सूचना देणत येणार आहेत.

तरी तपासणी पथकामार्फत आकस्मिक भेट देऊन तपासणी करणेत येणार आहे. त्याअनुषंगाने सर्व कागदपत्रे प्रात्यक्षिक कार्य, हजरी पत्रक, दैनंदिनी उपस्थिती इ. बाबी अद्ययावत ठेवाव्यात. भेटीबाबत आपल्याअध्यापक विद्यालयाचे अध्यक्ष/सचिव/पदाधिकारी यांनादेखील अवगत करणेत यावे.

(श्री अरुण पाटील)
वरिष्ठ अधिव्याख्याता
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
सांगली

(डॉ.आर.ए.होसकोटी)
प्राचार्य,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था
सांगली.

प्रत माहितीस्तव सविनय सादर.

१. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
२. मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

Scanned with OKEN Scanner